पुनर्सुनावणी



# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.१३१/२२/त.क्र.२७/२५/०१

**श्री.अफजल अब्दुल करिम लखानी**

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता **(इ. व का.) आर/दक्षिण**
सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग कार्यालय, २ रा मजला,
स. व प. तरण तलावा जवळ, महात्मा गांधी काट रस्ता क्र.२
कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता **(इ. व का.) आर/दक्षिण**
सहाय्यक आयुक्त आर/दक्षिण विभाग कार्यालय, ३ रा मजला,
स. व प. तरण तलावा जवळ, महात्मा गांधी काट रस्ता क्र.२
कांदिवली (प.), मुंबई-४०० ०६७.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १८.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर तक्रारीवर आज दि.१८.११.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान तक्रारदार उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारदार श्री.अफजल लखानी यांनी अपिल क्र.१४०३/२१ यात दि.०९.११.२०२१ रोजी पारित आदेशात तत्कालिन जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती कागदोपत्री स्वरुपात स्पीड पोस्टने नि:शुल्क देण्याचे निर्देश जारी करण्यात आले असून जन माहिती अधिकाऱ्यांनी मागितलेली अनधिकृत बांधकामासंदर्भातील माहिती ही RETMS या शासकीय संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचा प्रतिसाद दिला होता.

तथापि, द्वितीय अपिल अर्जात दस्तऐवज स्वरुपातील प्रत देण्याचा आदेश दिला असून त्याचा कुठलाही अनुपालन अहवाल तसेच दि.०७.०३.२०२२ रोजी दाखल तक्रार अर्जावर कुठलाही खुलासा सादर केलेला नाही. ही बाब गंभीर असून विद्यमान जन माहिती अधिकारी (इ. व का.) आर/दक्षिण तसेच अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता (इ. व का.) आर/दक्षिण यांनी पुढील सुनावणीच्या आत उपरोक्त आदेशाचे अनुपालन केले किंवा कसे याबाबतचा लेखी खुलासा संपूर्ण दस्तऐवजासह व्यक्तीशः हजर राहून सादर करावा अन्यथा कलम १८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारान्वये पुढील कारवाई करण्यात येईल.

**आदेश**

**वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.११.२०२५**

State Information Commission Maharashtra

jyotsna